# सोलापूर लोहमार्ग पोलीसांची कामगिरी

सोलापूर रेल्वे पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार प्लॅटफॉर्म नं १ वर विशाखापट्टणम गाडीला अटेंड करून पेट्रोलिंग करत असताना प्रवासी महिला नामे – वंदना जंगम रा. हैद्राबाद हिचे पर्स व किमती साहित्य असलेला चिजवस्तू हे प्लॅटफॉर्म ०१ वर विसरून ते ०३ नंबर प्लॅटफॉर्म वरील गाडीत बसुन जात असताना पर्स प्लॅटफॉर्म ०१ वर विसरलेबाबत लक्षात आलेने, त्यांनी लागलीच पेट्रोलिंग वरील पोलीस अंमलदार पोशि गायकवाड यांना माहिती दिली, त्यावरून त्यांनी लगेच ०१ नंबर प्लॅटफॉर्म जावून पर्सचा शोध घेवून सदर महिलेची पर्स आतील सामानासह त्यांच्या ताब्यात दिली . महिलेने आतील साहित्य पाहून खात्री केली करून पोलीसांचे आभार मानून हैद्राबाद कडे रवाना झाली. याबदद्ल सोलापुर लोहमार्ग पोलीस ठाणेकडील पोशि गायकवाड याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

